दूरध्वनीक्रमांक:
०२०२५६२१४४०

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११००७
Website:www.unipune.ac.in
e-mail :coe@unipune.ac.in
sssapp-coord@pun.unipune.ac.in

संदर्भ: परीक्षा समन्वय/ १४०५     तातडीचे व महत्वाचे     दिनांक: १४/१०/२०२६

प्रति,

१. मा.पोलीस आयुक्त,
पुणे शहर/नाशिक शहर.

२. मा.पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण/ अहिल्यानगर जिल्हा व नाशिक ग्रामीण.

विषय :— १९ ऑक्टोबर २०२६ पासून होणाऱ्या हिवाळी सत्राच्या विद्यापीठ परीक्षांचे आयोजना बाबत...

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सन २०२६ मधिल हिवाळी सत्राच्या परीक्षा पुणे शहर, पुणे ग्रामीण, नाशिक शहर, नाशिक ग्रामीण, अहिल्यानगर शहर व अहिल्यानगर जिल्हयातील अनेक परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात येणार आहेत.

सन २०२६ च्या हिवाळी सत्रा मध्ये होणाऱ्या विद्यापीठाच्या लेखी परीक्षांचे नियोजन सुरू असून सदर परीक्षा विद्यापीठाची संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थामधून जवळपास ९०० परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

विद्यापीठामार्फत सन २०२६ मधिल हिवाळी सत्राच्या निरनिराळ्या परीक्षांचा कार्यक्रम टप्याटप्याने जाहीर करण्यात येत आहे. विद्यापीठाच्या परीक्षा अत्यंत शिस्तबध्द व निकोप वातावरणात पूर्ण करण्यासाठी संबंधित परीक्षा केंद्रप्रमुख, प्राचार्य/वरिष्ठ पर्यवेक्षक यांना तसेच विद्यापीठाला पोलीस विभागाची यापूर्वी आवश्यकतेनुसार सहकार्य मिळालेले आहे. तसेच येत्या सन २०२६ च्या हिवाळी सत्राच्या होणाऱ्या विद्यापीठाच्या निरनिराळ्या परीक्षांच्या दरम्यान सहकार्य मिळावे अशी अपेक्षा आहे.

तरी विद्यापीठाच्या उपरोक्त परीक्षा सुरू असे पर्यंतच्या कालावधीत शहरांच्या व जिल्हयातील संबंधित परीक्षा केंद्राच्या ठिकाणी तसेच परीक्षा केंद्रांचे केंद्रप्रमुख, प्राचार्य व वरिष्ठ पर्यवेक्षक यांना गरजेनुसार पोलीस सहकार्य कृपया उपलब्ध करुन द्यावे व तशा सूचना आपल्या विभागातील सर्व संबंधितांना द्याव्यात, ही विनंती.

विद्यापीठाच्या हिवाळी २०२६ सत्राच्या परीक्षा सुरळीत आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी आपण विद्यापीठास वेळोवेळी सहकार्य केलेले आहेच, ते यापुढेही मिळत राहील असा मला विश्वास आहे.

कळावे,

आपला,

डॉ. राजेंद्र तलवारे
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :—

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये

२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था

विद्यापीठ परीक्षांचे आयोजन व्यवस्थित व निकोप वातावरणात पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची/संस्थेची आहे. याकरिता आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त नजिकच्या पोलीस चौकीकडून उपलब्ध करुन घेण्यात यावा. महाविद्यालयामध्ये/संस्थेमध्ये पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाची राहील.